# विराटचं स्वप्न पुन्हा एकदा भंगलं!

## आरसीबीचा ट्रॉफी जिंकण्याचा १७ वर्षांचा दुष्काळ कायम; राजस्थानचा विजय

चेन्नई/वृत्तसंस्था

**संजू सॅमसनच्या राजस्थानने आरसीबीचा पराभव करत क्वालिफायरचं तिकिट मिळवले आहे. अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर एलिमेनटरच्या सामन्यात राजस्थानने आरसीबीचा चार विकेटने पराभव केला. आरसीबीने दिलेले १७३ धावांचे आव्हान राजस्थानने १९ षटकात सहा विकेटच्या मोबदल्यात सहज पार केले.**





आरसीबीचा अहमदाबादमध्ये पराभव करत राजस्थानने चेन्नईचं तिकिट मिळवले आहे. राजस्थान आता क्विलिफायर २ मध्ये हैदराबादविरोधात भिडमार आहे. हैदराबादला कोलकात्याकडून क्वालिफायर एक मध्ये पराभवाचा सामना करावा लागला. २४ मे रोजी चेन्नईमध्ये हैदराबाद आणि राजस्थान यांच्यामध्ये आमनासामना होणार आहे. यामधील विजेता संघ २६ मे रोजी कोलकात्याशी भिडणार आहे.

आयपीएल २०२४ मध्ये आरसीबीने शानदार कमबॅक करत प्लेऑफमध्ये स्थान पटकावले होते. आरसीबीने लागोपाठ सहा सामन्यात विजय मिळवत प्लेऑफचं तिकिट मिळवलं होतं. पण आरसीबीला एलिमेनटरचा अडथळा दूर करता आला नाही. आरसीबीने आतापर्यंत नऊ वेळा प्लेऑफमध्ये प्रवेश केलाय, पण त्यांना चषकावर नाव कोरता आले नाही. १७ वर्षानंतरही आरसीबीला चषक उंचवता आलेला नाही. तीन वेळा त्यांनी फायनलमध्येही धडक मारली, पण चषकापासून दूरच राहिले. १७३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना यशस्वी जायस्वाल यानं आक्रमक सरुवात केली. त्याने आरसीबीच्या प्रत्येक गोलंदाजाचा समाचार घेतला. यशस्वी जायस्वाल याने ३० चेंडूत ४५ धावांचा पाऊस पाडला. या खेळीमध्ये त्याने आठ चौकार लगावले. आघाडीचे फलंदाज माघारी गेल्यामुळे राजस्थानचा डाव फसणार का? असा सवाल उपस्थित होत होता. पण रियान परागने जिगरबाज खेळी करत राजस्थानच्या डावाला आकार दिला. रियान पराग याने २६ चेंडूमध्ये ३६ धावांचा पाऊस पाडला. या खेळीमध्ये रियान पराग याने दोन षटार आणि दोन चौकार ठोकले. दुखापतीनंतर शिमरोन हेटमायर यानं शानदार कमबॅक केले. हेटमायर याने आरसीबीच्या गोलंदाजांवर प्रतिहल्ला करत दबाव कमी केली. हेटमायर याने १४ चेंडूमध्ये २६ धावांची खेळी केली. या खेळीमध्ये त्याने तीन चौकार आणि एक षटकार ठोकला. सहा फलंदाज तंबूत परतल्यानंतर रोवमन पॉवेल याने फिनिशिंग टच दिला. पॉवेल याने आठ चेंडूमध्ये १६ धावांची खेळी केली. या खेळीमध्ये पॉवेल याने एक षटकार आणि दोन चौकार ठोकले.

**संजू फ्लॉप :** आरसीबीने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना संजू सॅमसन याला मोठी खेळी करता आली नाही. संजू सॅमसन याने आपली विकेट फेकली. संजू सॅमसन याला १३ चेंडूमध्ये फक्त १७ धावाच करता आल्या. या खेळीमध्ये त्याला एक षटकार ठोकता आल्या. टॉम केडमोर यानेही निराशा केली. केडमोर याने १५ चेंडूत २० धावा केल्या. या खेळीत त्याने चार चौकार ठोकले. ध्रुव जुरेल यालाही मोठी खेळी करता आली नाही. ध्रुव जुरेल याने आठ धावांचे योगदान दिले.

**आरसीबीची गोलंदाजी :** आरसीबीकडून मोहम्मद सिराज सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. सिराजने दोन फलंदाजांना तंबूत पाठवले. लॉकी फर्गुसन, कर्ण शर्मा आणि कॅमरुन ग्रीन यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली.

**मोठी धावसंख्या उभारण्यात अपयश :** आरसीबीला पहिला धक्का फॅफ ड्यु प्लेसिसच्या रुपात बसला, त्याला १७ धावा करता आल्या. त्यानंतर विराट कोहलीवर संघाची भिस्त होती. कोहली पुन्हा मोठी खेळी साकारणार का, याची उत्सुकता सर्वांना लागली होती. पण कोहली यावेळी ३३ धावा करू शकला.

# भारत-पाकिस्तानच्या सरकारने एकी दाखवावी

## माजी खेळाडूचं रोखठोक मत

नवी दिल्ली/वृत्तसंस्था

क्रिकेट म्हणजे भारतात जणू काही धर्मच... या धर्माचे कोट्यवधी भक्त आहेत. भारताशिवाय शेजारील पाकिस्तानात देखील क्रिकेटची भलतीच क्रेझ आहे. भारत आणि पाकिस्तान हे क्रिकेटच्या मैदानावर भिडतात तेव्हा अवघ्या जगाचे लक्ष वेधून घेतात. पण, हे कट्टर प्रतिस्पर्धी केवळ आयसीसी आणि आशिया चषकाच्या स्पर्धेत आमनेसामने येतात. मागील मोठ्या कालावधीपासून भारत आणि पाकिस्तान यांच्यात एकही द्विपक्षीय मालिका झालेली नाही. मात्र दोन्हीही संघांमध्ये मालिका व्हावी अशी इच्छा भारतीय कर्णधार रोहित शर्मासह पाकिस्तानच्या माजी खेळाडूंनी व्यक्त केली आहे. पाकिस्तानी संघाचा माजी कर्णधार युनूस खानने याबद्दल बोलताना भारत आणि पाकिस्तानने क्रिकेटसाठी एकत्र यायला हवे असे म्हटले आहे. युनूस खानने पाकिस्तानातील माध्यमांशी बोलताना म्हटले की, भारत आणि पाकिस्तान यांच्यात द्विपक्षीय मालिका व्हायला हवी. केवळ एक-दोन सामने खेळवले जावेत या विचाराचा मी नाही. कारण विश्वचषकात जेव्हा हे दोन संघ भिडतात तेव्हा जो संघ हरतो तो दबावात जातो. त्यामुळे जर या संघांमध्ये मालिका झाली तर हा दबाव कमी होईल. भारत आणि पाकिस्तान सामन्यामुळे खेळाडू तयार होतात, त्यांना एक नवीन ओळख मिळते.



या सामन्यात जो चांगली कामगिरी करतो तो स्टार बनतो. खेळासाठी, क्रिकेटसाठी दोन्हीही देशांनी एकत्र यायला हवे, खेळाडू एकत्र आहेतच पण सरकारांनी पण एकी दाखवायला हवी. दोन्ही संघातील खेळाडू एकमेकांशी चर्चा करतात... मला वाटते की, सरकार आणि दोन्हीही देशाच्या क्रिकेट बोर्डांनी समोर येऊन याबाबत विचार करायला हवा.


भारत आणि पाकिस्तान यांच्यात द्विपक्षीय मालिका होईल का? या प्रश्नावर रोहितने अलीकडेच एका मुलाखतीत सांगितले होते की, याबद्दल मला काही माहिती नाही. पण, मला वाटते की नक्कीच कसोटी मालिका व्हायला हवी. शेवटी मी देखील एक क्रिकेटर आहे. मला खेळायला आवडेल आणि आव्हान द्यायला आवडेल. मला कोणत्याही संघाविरूद्ध खेळायला आवडेल आणि पाकिस्तान हा एक चांगला संघ आहे. त्यांच्याकडे अप्रतिम गोलंदाज आहेत.

# युवराजने निवडला विश्वचषकासाठी संघ

**मुंबई** : रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ १ जूनपासून सुरू होणाऱ्या वर्ल्ड कप स्पर्धेत खेळणार आहे. २००७च्या वर्ल्ड कप विजेत्या संघातील स्टार खेळाडू युवराज सिंग यंदाच्या वर्ल्ड कप स्पर्धेचा ब्रँड ॲम्बेसेडर आहे. त्याने आगामी स्पर्धेसाठी टीम इंडियाची प्लेइंग इलेव्हन कशी असेल याबाबत मत व्यक्त केले आहे.

तो म्हणाला, माझ्या मते रोहित शर्मा व यशस्वी जैस्वाल यांनी सलामीला यायला हवे. विराट कोहली तिसऱ्या क्रमांकावर फिट आहे आणि त्यानंतर सूर्यकुमार यादव चौथ्या क्रमांकावर व पुढे अनेक मोठी नावं आहेतच. या संघात मला लेफ्ट हँड व राईट हँट कॉम्बिनेशन अधिक पाहायला आवडेल, कारण त्यामुळे प्रतिस्पर्धी गोलंदाजांना गोलंदाजी करणे अवघड जाईल.

यष्टिरक्षकाच्या शर्यतीत संजू सॅमसन व रिषभ पंत यांच्यात चढाओढ आहे. या दोघांनी आयपीएल २०२४ मध्ये दमदार कामगिरी केली आहे. संजूने कर्णधारपदाची जबाबदारीही सक्षमपणे पार पाडली आहे, परंतु तो ठळ साठी वरच्या क्रमांकावर फलंदाजी करतोय. त्याने १४ सामन्यांत ५०४ धावा केल्या आहेत आणि ऑरेंज कॅपच्या शर्यतीत तो सातव्या क्रमांकावर आहे. तेच दुसरीकडे १४ महिन्यानंतर मैदानावर परतलेल्या रिषभने १३ सामन्यांत ४४६ धावा केल्या आहेत. पण, युवराज म्हणतोय, मी रिषभ पंतची निवड करीन. संजू हा चांगल्या फॉर्मात आहे, परंतु रिषभ हा डावखुरा फलंदाज आहे आणि भारताला सामना जिंकून देण्याची क्षमता त्याच्यात आहे. त्याने यापूर्वीही हे केलं आहे.



हार्दिक पांड्या या संघाचा उप कर्णधार आहे, परंतु त्याला आयपीएलमध्ये काही खास कामगिरी करता आलेली नाही. तरीही युवी त्याच्या मागे उभा आहे. त्याची प्लेइंग इलेव्हनमध्ये निवड व्हायला हवी, असे युवी म्हणाला. पण, त्याने त्याच्या फिटनेसवर चिंता व्यक्त केली. याचवेळी त्याने शिवम दुबेची संघात निवड केली आहे. दुबेने आयपीएलमध्ये १४ सामन्यांत ३९६ धावा केल्या आहेत. युझवेंद्र चहल याचीही प्लेइंग इलेव्हनमध्ये युवीने निवड केली आहे. चहलने ११ सामन्यांत १४ विकेट्स घेतल्या आहेत. जसप्रीत बुमराह व मोहम्मद सिराज हे दोन जलदगती गोलंदाज युवीच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये आहेत.

# नवख्या अमेरिकेकडून बांगलादेशचा धुव्वा

हॉऊस्टॉन/वृत्तसंस्था

ट्वेंटी-२० विश्वचषक २०२४ चे यजमानपद अमेरिका आणि वेस्ट इंडिज यांच्याकडे आहे. २ जूनपासून क्रिकेटच्या सर्वात लहान फॉरमॅटचा विश्वचषक खेळवला जाईल. विश्वचषकासारखी मोठी स्पर्धा तोंडावर असताना यजमान अमेरिकेने बांगलादेशचा पराभव करून 'तैय्यार है हम' हे दाखवून दिले. बांगलादेश आणि अमेरिका यांच्यात तीन सामन्यांची ट्वेंटी-२० मालिका खेळवली जात आहे.



या मालिकेतील पहिला सामना जिंकून अमेरिकेने विजयी सलामी दिली. क्रिकेट विश्वाला धक्का देताना अमेरिकेने बांगलादेशचा ५ गडी राखून धुव्वा उडवला.

अमेरिकेकडून हरमीत सिंगने निर्णायक खेळी करताना १३ चेंडूत ३३ धावांची कुटल्या. भारतीय वंशाच्या या शिलेदाराने आपल्या संघाच्या विजयात महत्त्वाचे योगदान दिले. खरे तर त्याने अंडर-१९ विश्वचषकात भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. याशिवाय आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सचा तो हिस्सा राहिला आहे. उन्मुक्त चंदच्या नेतृत्वात भारतीय संघाने २०१२ मध्ये अंडर-१९ विश्वचषक उंचावला होता. हरमीत या विश्वविजेत्या संघाचा भाग होता. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशला म्हणावी तशी धावसंख्या उभारता आली नाही. बांगलादेशने निर्धारित २० षटकांत १५३ धावा केल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना अमेरिकेने सहज लक्ष्य गाठले. १९.३ षटकांत आव्हान गाठून विजयी सलामी देण्यात अमेरिकेला यश आले.

### विश्वचषकासाठी चार गट

**अ** - भारत, पाकिस्तान, आयर्लंड, कॅनडा, अमेरिका

**ब** - इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, नामिबिया, स्कॉटलंड, ओमान

**क** - न्यूझीलंड, वेस्ट इंडिज, अफगाणिस्तान, युगांडा, पापुआ न्यू गिनी

**ड** - दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, बांगलादेश, नेदरलँड्स, नेपाळ

# हरभजन सिंहने पांड्याची केली पाठराखण

## हार्दिकची काहीच चूक नाही | रोहितला धरले जबाबदार

मुंबई/वृत्तसंस्था

आयपीएल २०२४ मध्ये मुंबई इंडियन्सची अवस्था अतिशय दयनीय झाली. साखळी फेरीतच मुंबईचे आव्हान संपुष्टात आले. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वातील मुंबईला १४ पैकी फक्त चार सामने जिंकता आले. गुणतालिकेत मुंबई इंडियन्स दहाव्या क्रमांकावर राहिला. आयपीएल २०२४ आधी मुंबईने हार्दिक पांड्याला गुजरात टायटन्समधून ट्रेंड केले, त्यानंतर रोहित शर्माची हाकलपट्टी करुन त्याला कर्णधार केले. आयपीएल स्पर्धेदरम्यान चाहत्यांनी हार्दिक पांड्याला ट्रोल केले. मुंबईच्या दैयनीय स्थितीला हार्दिक पांड्या जबाबदार असल्याचे अनेक चाहत्यांनी मत व्यक्त केले. पण मुंबईचा माजी खेळाडू हरभजन सिंह यानं मुंबईच्या या स्थितीला हार्दिक पांड्या जबाबदार नसल्याचे म्हटलेय. मुंबईच्या खराब स्थितीसाठी सिनियर खेळाडू जबाबदार असल्याचं भज्जी म्हणाला. हरभजन सिंह याने रोहित शर्माचे थेट नाव घेतले नाही, पण रोख तिकडेच होता. हार्दिक पांड्या आणि रोहित शर्मा यांच्यामध्ये उभी फूट पडल्याचे अनेकदा समोर आले होते. अनेक माजी खेळाडूंनीही तसा दावा केला होता. आता हरभजन सिंह याच्या वक्तव्याची चर्चा होत आहे.



### हरभजन सिंह काय म्हणाला?

मी मुंबई इंडियन्ससोबत मी १० वर्षे खेळलो आहे. येथील संघ व्यवस्थापन उत्तम आहे, पण हार्दिक पांड्याला कर्णधार करण्याचा निर्णय फसला. हार्दिक पांड्याला कर्णधार बनवताना व्यवस्थापन भविष्याचा विचार करत होते, पण ते जमलं नाही. जेव्हा संघ खेळत होता, तेव्हा असे वाटत होते की जणू कॅप्टन वेगळा खेळत आहे आणि संपूर्ण संघ वेगळा आहे. मला वाटते (पंड्याला कर्णधार बनवण्याची) वेळ योग्य नव्हती. कदाचित हे वर्षभरानंतर करता आले असते. गुजरात टायटन्सचा कर्णधार असल्यामुळे हार्दिक पांड्याचा यात दोष नाही. संघ एकत्रितपणे खेळला नाही आणि संघ एकसंध कधीच वाटला नाही. कर्णधार वेगळा आणि केळाडू वेगळे वाटत होते. मोठ्या संघाची अशी अवस्था पाहून वाईट वाटले. मी त्या संघाचा सदस्य राहिलोय. संघात दिग्गज खेळाडू असताना अशी अवस्था झाल्यामुळे वाईट वाटलं. हार्दिक पांड्याला कर्णधार करण्याचा निर्णय योग्यवेळी घेतला असं वाटत नाही. मॅनेजमेंटने हा निर्णय घेतल्यानंतर संघ एकसंध खेळला नाही. यावेळी वरिष्ठ खेळाडूंचा रोल महत्वाचा ठरतो, ते दिसलं नाही. मुंबई इंडियन्स एकसंघासारखा खेळली नाही.

### हार्दिक पांड्याची काहीच चूक नाही - भज्जी

मुंबईचा माजी फिरकी गोलंदाज हरभजन सिंह याने स्पष्ट मत व्यक्त केले. मुंबईच्या खराब प्रदर्शनात हार्दिक पांड्याची काहीच चूक नाही. हार्दिक पांड्याला कर्णधार करण्याचा निर्णय चुकीच्या वेळी घेतला गेला. जर वर्षभरानंतर हार्दिक पांड्याला कर्णधार केले असतं, तर परिस्थिती वेगळी असती. गुजरातमध्ये हार्दिक पांड्या चांगले नेतृत्व करतच होता. मुंबईची खराब स्थिती झाली, त्यात हार्दिक पांड्याची काहीच चूक नाही. आशावेळी सिनियर खेळाडूंची जबाबदारी वाढते, पण त्यांच्याकडून एकसंध टीम होण्याची काहीच झाले नाही. कर्णधार कुणीही असो, टीम सर्वात आधी. कर्णधार येतात जातात पण संघ तिथेच असतो, असे भज्जी म्हणाला.

### मुंबईचा संघ दोन गटात विभागला ?

आयपीएल २०२४ आधी मुंबई इंडियन्सने अतिशय बोल्ड निर्णय घेतला. पाच वेळच्या आयपीएल विजेता कर्णधार रोहित शर्माची कर्णधारपदावरुन हकालपट्टी केली. मुंबईने हार्दिक पांड्याकडे नेतृत्व सोपवलं, खरं पण त्याला प्रभाव पाडता आला नाही. अंतर्गत आणि बाहेरील दबावात हार्दिकला चोख कामगिरी करता आली नाही. मुंबईचं आव्हान साखळी फेरीतच संपुष्टात आले. दुसरीकडे मुंबईचा ताफा दोन गटात विभागल्याच्या बातम्याही धडकल्या. भारतीय खेळाडू रोहित शर्माच्या बाजूने तर विदेशी खेळाडू हार्दिकच्या बाजूने असल्याच्या बातम्याही आल्या. इतकेच नाही तर रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह आणि सूर्यकुमार यादव यासारख्या खेळाडूंनी हार्दिक पांड्याच्या स्वभावाची तक्रार टीम मॅनेजमेंटकडे केल्याच्या चर्चेनेही जोर धरला. रोहित शर्मा मुंबईची साथ सोडणार, ही चर्चा सुरु आहे.

# फायनलमध्ये जाताच कोलकाताचे सेलिब्रेशन

## रसेल-नारायणचा कॅरेबियन डान्स

अहमदाबाद/वृत्तसंस्था

आयपीएल २०२४ मधील क्वालिफायर १ सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सनं सनरायझर्स हैदराबादचा आठ विकेट्सनी धुव्वा उडवून फायनलमध्ये धडक मारली.

कोलकात्यानं तब्बल ३८ चेंडू आणि आठ विकेट्स राखून विजयी लक्ष्य गाठलं. वेंकटेश अय्यर आणि कर्णधार श्रेयस अय्यरची नाबाद अर्धशतकं कोलकात्याच्या विजयात निर्णायक ठरली. त्या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ९७ धावांची अभेद्य भागीदारी रचली. त्याआधी, मिचेल स्टार्कनं तीन, तर वरुण चक्रवर्तीनं दोन विकेट्स काढून हैदराबादचा डाव गुंडाळण्यात मोलाची भूमिका बजावली होती. फायनलमध्ये धडक मारल्यानंतर कोलकात्याच्या खेळाडूंनी जोरदार जल्लोष केला. मंगळवारी रात्री कोलकात्याची खेळाडूंनी पार्टी केली. डिस्कोमध्ये खेळाडूंनी जोरदार डान्स केला. याचा व्हिडीओ व्हायरल झालाय.



### नारायण-रसेल डिस्कोमध्ये थिरकले

कोलकाता फायनलमध्ये पोहचल्यानंतर मालक शाहरुख खान यानं नरेंद्र मोदी स्टेडियमवर चाहत्यांचं अभिवादन केले. हैदराबादचा पराभव केल्यानंतर कोलकात्याच्या खेळाडूंनी जोरदार सेलिब्रेशन केले. आंद्रे रसेल आणि सुनील नारायण यांनी डिस्कोमध्ये जाऊन डान्स केला. मंगळवारी रात्री रसेल आणि नारायण डिस्कोच्या गाण्यावर थिरकले. दोघांचा कॅरेबियन डान्स सोशल मीडियावर चर्चेत आहे.